सुरक्षारक्षक पुरविण्यात आलेल्या व्यक्तीस तसेच लोकप्रतिनिधीस निवडणूक प्रतिनिधी, मतदान प्रतिनिधी या मतमोजणी प्रतिनिधी न नेमणेबाबत.

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ/जिपपंस/२०१६/प्र.क्र.२३/का.७
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग,मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १९/१०/२०१६

## आदेश

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संबंधित अधिनियमाखाली तयार करण्यात आलेल्या नियमांमध्ये निवडणूक प्रतिनिधी, मतदान प्रतिनिधी तसेच मतमोजणी प्रतिनिधी यांची नेमणूक करण्यासंदर्भातील तरतूदी आहेत. तथापि, यासंदर्भात सुरक्षा पुरविलेले मंत्री, खासदार, विधानसभा सदस्य, विधान परिषद सदस्य किंवा इतर कोणत्याही व्यक्ती यांची निवडणूक प्रतिनिधी, मतदान प्रतिनिधी अथवा मतमोजणी प्रतिनिधी म्हणून नियुक्ती करता येईल किंवा कसे अशी राज्य निवडणूक आयोगाकडे विचारणा करण्यात येते.

२. यासंदर्भात विचारात घेणे आवश्यक असलेल्या बाबी म्हणजे शासनाने सुरक्षा पुरविलेल्या व्यक्तीची निवडणूक प्रतिनिधी, मतदान प्रतिनिधी तसेच मतमोजणी प्रतिनिधी म्हणून नेमणूक करण्यासाठी त्या व्यक्तीस सुरक्षा सोडण्याची परवानगी देता येणार नाही. कारण सुरक्षा सोडण्याची परवानगी दिल्यास, त्या व्यक्तीची वैयक्तिक सुरक्षा धोक्यात येऊ शकते. दुसरी महत्वाची बाब म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका समान पातळीवर लढविता येणे सर्वांना शक्य व्हावे तसेच निवडणुका निर्भय व मुक्त वातावरणात पार पाडल्या जाव्यात यादृष्टीने खासदार, विधानसभा सदस्य, विधान परिषद सदस्य, इत्यादी लोकप्रतिनिधींना उमेदवाराचे निवडणूक प्रतिनिधी, मतदान प्रतिनिधी तसेच मतमोजणी प्रतिनिधी म्हणून नियुक्ती देणे योग्य ठरणार नाही.

३. वरील परिस्थितीत भारतीय संविधानाच्या २४३ के व २४३ झेडए तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संबंधित अधिनियमातील तरतुदीनुसार राज्य निवडणूक आयोगास प्राप्त झालेल्या

अधिकाराचा वापर करुन असे आदेशित करण्यात येत आहे की, कोणताही राज्य विधानमंडळ सदस्य (विधानसभा / विधानपरिषद) संसद सदस्य (लोकसभा/राज्यसभा) / केंद्रीय वा राज्य शासनाचा मंत्री तसेच कोणत्याही स्थानिक स्वराज्य संस्थेचा आजी सदस्य तसेच सुरक्षा व्यवस्था पुरविण्यात आलेली कोणतीही व्यक्ती यास निवडणूक प्रतिनिधी, मतदान प्रतिनिधी तसेच मतमोजणी प्रतिनिधी म्हणून नेमण्यात येऊ नये.

४. उपरोक्त आदेश निवडणूक लढविणाऱ्या सर्व उमेदवारांच्या निदर्शनास आणून देण्यात यावेत व उपरोक्त निदेशांचे काटेकोरपणे पालन होईल याची दक्षता घेण्यात यावी.

५. तसेच उमेदवाराच्या सहीप्रमाणेच निवडणूक प्रतिनिधीच्या सहीचा नमुना देखील मतदान केंद्रावर पाठवावा. जेणेकरुन मतदान केंद्राध्यक्षांना निवडणूक प्रतिनिधीच्या सहीचे कोणतेही कागदपत्र प्राप्त झाल्यास त्यावरील सही तपासता येईल.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांचे आदेशानुसार,

(नि. ज. वागळे)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत :-
१) सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
२) सचिव, ग्रामविकास विभाग, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई-१
३) सर्व विभागीय आयुक्त
४) सर्व महानगर पालिका आयुक्त
५) सर्व जिल्हाधिकारी
६) राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी
७) निवड नस्ती